Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

# सराव परीक्षा २०२१-२२

इ.१२ वी विज्ञान | गुण – ८०

विषय - मराठी

## कृतिपत्रिका

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

*(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने व्यवस्थित काढाव्यात.*

*(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

## विभाग १ - गद्य [२०]

कृती १. (अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (८)

(१) कृती करा : (२)

लेखिकेने पर्यटकाच्या नजरेतून बघितलेली ठिकाणे → (य) ................ → (र) ................

(२) चौकटी पूर्ण करा : (२)

(य) तोलोलिंग फत्ते करणारे शिल्पकार - [ ]

(र) भारतीयत्वाचा सुगंध ल्यालेले - [ ]



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

लेह, नुब्रा व्हॅली, पँगाँग लेक आणि शेवटी द्रास, कारगिल अशा अव्याहत प्रवासात सतत भेटणारे, भरभरून बोलणारे जवान. त्यांची लष्करी अदब; प्रांत, धर्म, जात, भाषा अशा कुठल्याही प्रतिबंधाचा स्पर्शही नसलेले, केवळ भारतीयत्वाचा सुगंध ल्यालेले, सरहद्दीवर जागते राहिलेले आपले जवान! त्यांच्या शौर्याची, धाडसांची, खडतर साहसांची सतत आठवण राहावी, म्हणून सुरू केलेल्या मिशन लडाखचं हे शेवटचं पाचवं वर्ष. भाग्यश्रीच्या आणि बरोबर आलेल्या प्रत्येकाच्या मनात ही संवेदना निर्माण झाली, हे त्यांचंच फलित. 'याचसाठी केला होता अट्टाहास!' गेल्या पाच वर्षांत एक मात्र निश्चित जाणवलं, की तिथे गेल्यावर आपला अहंकार, बडेजाव आणि प्रतिष्ठितपणाची चढलेली पुटं निखळून पडताहेत. लडाखच्या भिन्न भिन्न दऱ्याखोऱ्यांत भन्नाट एकाकी, रौद्र आणि हिरवळीचा दुरान्वयानेही संबंध नसलेल्या कठीण भूप्रदेशात राहूनही ममत्व, बंधुभाव जपणाऱ्या, नाती जोडणाऱ्या आणि ती टिकवणाऱ्या सैनिकांना भेटलं, की 'आपली माणसं' भेटल्याचा गहिवर दाटून येत आहे. आपले सैनिक हे हिरे आहेत. त्यांना आपण जपलं पाहिजे. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे. आम्ही पाच वर्षं रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत. याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडिअर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात, याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता?

(३) स्वमत अभिव्यक्ती – (४)

'आम्हांला सैनिक नावाचा माणूस कळू लागला,' या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

**किंवा**

सैनिकांचे जीवन आणि सामान्य नागरिकांचे जीवन यांची तुलना तुमच्या शब्दांत करा.



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (८)

(१) कृती करा : (२)

डायनिंग टेबलजवळच्या खिडकीतून लेखकाने पाहिलेली दृश्ये → (१) .............. → (२) ..............

(२) कारणे लिहा : (२)

(१) लेखक हलकेच खिडकी उघडतो, कारण......

(२) पाखरांचा चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण.........

मी हलकेच उठतो. चूळ भरतो. डायनिंग टेबलजवळ येतो. त्याच्या जवळची खिडकी हलकेच उघडतो. रात्रीच्या नीरव शांततेची निद्रा भंग होऊ नये म्हणून. बाहेर पाहतो तो आसमंतात काळाकुळकुळीत अंधार दाटलेला. बागेतल्या साऱ्या झाडांचा, साऱ्या वेलींचादेखील डोळा लागलेला. त्यांच्यावरची पाखरंदेखील गाढ झोपलेली. त्यांचा चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण आता फक्त पहाटेचे तीन-साडेतीन तर वाजलेले असतात. का कुणास ठाऊक, ही वेळ मला फार आवडते. सारं जग साखरझोपेत असतं. साऱ्या चिंता-काळज्या मिटल्या-विरलेल्या असतात. मन कसं समेवर आलेलं असतं. मला वाटतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं, जे सुखदु:खांच्या पलीकडे कुठंतरी दूर दूर गेलेलं असतं. आपलंच नव्हे तर या दुधाळ सायलीचंदेखील, जांभुळसर जॅक्रांडाचं-देखील, किरमिजी-निळसर-पिवळसर इवलाल्या इंद्रधनुष्यी फुलांच्या घाणेरीचंदेखील, पांढऱ्याशुभ्र नि रक्तचंदनी चाफ्याचंदेखील. या साऱ्यांमध्ये नि माझ्यामध्ये असं कोणतं बरं नातं आहे? कोणते रेशीमबंध आहेत? कोणती जवळीक आहे? केव्हा पहाट होते नि केव्हा मी या साऱ्यांना भेटतो, अशी असोशी मनाला का बरं लागून राहते? हे रेशीमबंध कुठं तरी आदिमत्वाकडे तर मनाला ओढून नेत नाहीत? मानवाला निसर्गाची जी ओढ युगानुयुगांपासून लागून राहिली आहे, ती या आदिम, ऋजू, स्नेहबंधनांमुळे तर नाही?.....



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

(३) स्वमत अभिव्यक्ती : (४)

'मला वाटतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं'.

वरील विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

किंवा

निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्पर संबंध तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (४)

(१) विधाने पूर्ण करा : (२)

(य) शाश्वत सत्य म्हणजे............

(र) म्हणींचे पहिले वैशिष्ट्य............

समाजाने जिवाभावाने जतन केलेले, रोजच्या जीवनाला पथदर्शक म्हणून पदोपदी उपयोगी पडणारे, समाजमन आणि समाजव्यवस्था, अभिरुची यांच्या चाळणीतून गळून खाली उरलेले शाश्वत सत्य म्हणजे आपल्या भाषेतील म्हणी होत. ते लोकधन आहे. ते लोकजीवनाचे दर्पण आहे. लोकजीवनाचा शाश्वत सारांश आहे. लोकसाहित्याला श्रीमंत करण्यात या म्हणींचे योगदान लक्षणीय आहे. अनुभवदर्शन, विचारदर्शन, स्वभावदर्शन व जीवनदर्शन घडविणाऱ्या या म्हणींचे पहिले वैशिष्ट्य असे, की या म्हणींतून त्या काळच्या समाजाचे समग्र आणि निर्दोष दर्शन घडते. गुण-अवगुण, व्यंग-विकृती, कंजूष-खर्चिक, कामांध नि धनांध, भूक-भोग, दिमाख-दिवाळं, विवेक-अविवेक, खादाड नि खुनशी अशा नाना वैशिष्ट्यांनी ओतप्रोत भरलेल्या म्हणींचा मोठा खच व्यवहारात झालेला असतो आणि स्वभावाबरोबरच समाजाचे जवळ जवळ परिपूर्ण दर्शन या म्हणींतून घडते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे यात कल्पिताचा आधार घेतलेला नसतो.

— डॉ. द. ता. भोसले

(२) कारणे लिहा : (२)

(य) म्हणींचे योगदान लक्षणीय आहे, कारण.......... .

(र) समाजाचे परिपूर्ण दर्शन म्हणींतून घडते, कारण........... .



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

## विभाग २ - पद्य [१६]

कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (८)

(१) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा : (२)

(१) अतोनात कष्टांनंतर हिरव्या समृद्धीच्या स्वरूपात शिल्लक राहते.

(२) स्वतःचा जीवच जणू कांद्याच्या रोपाच्या रूपात लावते.

(२) खालील चौकटी पूर्ण करा : (२)

| कवितेतील स्त्री करत असलेली कामे | |
|---|---|
| (१) | (२) |

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
चरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांद्या कांद्यांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

(३) स्वमत अभिव्यक्ती : (४)

शेतकरी स्त्रियांच्या कष्टमय जीवनाचे वर्णन कवितेच्या आधारे लिहा.

(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा : (४)

सत्त्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें॥

(इ) खालीलपैकी कोणतीही एक कृती करा : (४)

काव्य सौंदर्य :

'त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.'

वरील काव्यपंक्तींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

किंवा



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

रसग्रहण :

'रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!
कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!'

वरील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा [१०]

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(अ) (१) केवळ एका वाक्यात उत्तरे लिहा : (२)

(य) कथेतील पात्रांचे वाचकांशी जवळीक साधण्यामागील कारण लिहा.

(र) कथानकाचे प्रयोजन लिहा.

कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच 'कथाबीज' असे म्हणतात. कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते. पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व'निर्मिती असते.

(२) कारणे लिहा : (२)

कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो, कारण -

(य) ..............................

(र) ..............................

(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (६)

(१) 'शोध' या कथेच्या नायिकेचे शब्दचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

(२) 'उत्तम डॉक्टर होण्यापेक्षा उत्तम नर्स होणे कठीण आहे,' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(३) 'गढी' या शीर्षकाची समर्पकता पटवून द्या.

(४) गावातल्या उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी

[१४]

कृती ४. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (४)

(१) मुलाखतीचे प्रमुख हेतू तुमच्या शब्दांत लिहा.

(२) माहितीपत्रकाचे स्वरूप विशद करा.

(३) अहवाल लेखनाची कोणतीही 'दोन' वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) माहितीपत्रकाची भाषाशैली तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (१०)

(१) 'मुलाखतीची पूर्वतयारी' खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा :

पूर्वतयारीची गरज ...... ज्यांची मुलाखत घ्यायची त्यांची संपूर्ण माहिती ...... मुलाखतीचे उद्दिष्ट .......लागणारा वेळ व श्रोतृवर्ग ....... मुलाखतीचे माध्यम.

0 5 1 0



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

(२) 'माहितीपत्रकाची गरज' खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा :
सामान्य वस्तूंपासून मोठ्या वस्तूपर्यंत ...... विविध क्षेत्रे ....... 'माहिती' हा उद्देश ...... ग्राहकांचा फायदा ...... लोकमत आकर्षित.

(३) 'अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये' खालील मुद्द्यांना अनुसरून स्पष्ट करा :
वस्तुनिष्ठता ...... सुस्पष्टता ...... विश्वसनीयता ...... सोपेपणा ...... शब्दमर्यादा ...... नि:पक्षपातीपणा.

(४) 'मुलाखतीचा समारोप' खालील मुद्द्यांना अनुसरून स्पष्ट करा :
भाषिक कौशल्ये ...... परिणामकारक निवेदन ....... अनपेक्षित समारोप ....... श्रोत्यांचा प्रतिसाद ....... मुलाखतीची यशस्विता.

## विभाग ५ - व्याकरण व लेखन [२०]

कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा :

(१) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

पांढरा रंग सर्वांना आवडतो.

वरील वाक्याचे प्रश्नार्थक वाक्य ओळखा :

(१) कोणाला आवडतो पांढरा रंग?
(२) पांढरा रंग कोणाला आवडत नाही?
(३) सर्वांनाच पांढरा रंग आवडतो का?
(४) कोणाकोणाला आवडतो पांढरा रंग?

(र) सूचनेनुसार कृती करा : (१)

दवाखान्यात मोठ्या आवाजात बोलू नये.

वरील वाक्य होकारार्थी करा.

(२) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

'यथाशक्ती' या सामासिक शब्दातील समास ओळखा :

(१) अव्ययीभाव समास
(२) तत्पुरुष समास
(३) द्वंद्व समास
(४) बहुव्रीही समास



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

(र) 'नीलकमल' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. (१)

(३) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

'आपली पाठ्यपुस्तके संस्कारांच्या खाणी असतात.'

वरील वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

(१) कर्मणी प्रयोग

(२) कर्तरी प्रयोग

(३) भावे प्रयोग

(४) यांपैकी नाही

(र) योग्य पर्याय निवडा : (१)

भावे प्रयोग असलेले वाक्य शोधून लिहा.

(१) मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.

(२) सैनिकांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले.

(३) कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.

(४) तबेल्यातून घोडा अचानक पसार झाला.

(४) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

मुंगी उडाली आकाशी

तिने गिळिले सूर्यासी !

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

(१) अनन्वय

(२) अतिशयोक्ती

(३) अपन्हुती

(४) अर्थान्तरन्यास

(र) उपमान ओळखा : (१)

'अर्जुनासारखा पराक्रमी अर्जुनच.'

वरील वाक्यातील उपमान ओळखा.



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Sandesh from Ahmednagar District. Thanks Sandesh.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

(५) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

'मन समेवर येणे'.

वरील वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा :

(१) मन चंचल होणे.

(२) मनात उलथापालथ होणे.

(३) मन शांत व एकरूप होणे.

(४) मन शांत व निर्विकार होणे.

(र) 'मन समेवर येणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

(आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा : (१०)

(१) मी अनुभवलेली पहाट

(२) मी शेतकरी बोलतोय

(३) झाडे बोलू लागली तर......

(४) माझा आवडता कलावंत

(५) भ्रमणध्वनी यंत्र (मोबाईल फोन) शाप की वरदान?

◆◆◆



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi